# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ
कालमर्यादीत

क्रमांक :- २/एनजीसी/संस्था स्थलांतरण /२०१७/ ७७०
दिनांक : - 6 JUL 2017

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व
विद्यापीठ व्यवस्थापित आणि विद्यापीठ संस्था,
(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र पदवी संस्था)
( स्वायत्त संस्था वगळून )

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ व्यवस्थापित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल/ महाविद्यालय बदल करण्याबाबत......

पहा : १) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५
२) शासन अधिसूचना क्रमांक टीईएम - २०१५/सीआर २३६/टीई-४, दि. ११.०३.२०१६
३) शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र. ४७३/१६/तांशि-४, दि. २५.०४.२०१७
४) पदवी अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०१७-१८ चे प्रवेश माहिती पुस्तिका
५) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०१७/६९०, दि. १६.०६.२०१७

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करण्यात येत असून त्याअनुषंगाने वरील अधिसूचना व प्रवेश नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रथम वर्षाचा अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर पाठयक्रम किंवा पाळी किंवा संस्था बदलण्याची तरतूद संदर्भ क्रमांक ३ मधील नियम क्रमांक १६ मध्ये असून याबाबतची कार्यवाही करण्यास तंत्र शिक्षण संचालकास प्राधिकृत केलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेश माहिती पुस्तीकेतील नियम १७ मध्ये संस्था बदलाबाबतचे नियम दिले असून या विषयांकीत प्रकरणी कार्यवाही हेतू खालील निर्देश देण्यात येत आहेत.

१. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर ,पाठयक्रम किंवा पाळी बदलण्याची विनंती करणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून त्याच संस्थेत तसे बदल करण्याची तरतूद असून सदर बदल प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे करावयाचे आहेत. तरी, आपल्या संस्थेतील ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदलाकरीता अर्ज /विंनती केली आहे अशा विद्यार्थ्यांना जागांच्या उपलब्धतेनुसार प्रथम वर्षातील गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य निश्चित करून आपले स्तरावरुन (संस्था स्तरावरुन) नियमाचे काटेकोरपणे पालन करुन कार्यवाही करावी.

२. एका शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित महाविद्यालयातून दुस-या शासकीय, शासन अनुदानित व विद्यापीठ संचलित महाविद्यालयामध्ये पहिल्या, द्वितीय व तिस-या वर्षानंतर संस्था बदलाची तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणून आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी इतर शासकीय व शासन

अनुदानित संस्थेत (स्वायत्त संस्था वगळून) बदलीसाठी इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना संदर्भ क्रमांक ३ व ४ मधील बदलीबाबतचे नियम निदर्शनास आणून दयावेत. आपल्या संस्थेतील जे विदयार्थी इतर शासकीय व शासकीय अनुदानित संस्थेत बदलीसाठी आपणाकडे अर्ज करतील अशा सर्व विद्यार्थ्यांची बदली बाबत त्यांनी दिलेली कारणे (वैद्यकीय, आर्थिक अडचण, वडिलांची/पालकांची बदली इत्यादी) नमूद करुन विदयार्थ्यांची नांवे गुणानुक्रमाने एकत्रितरित्या सोबत जोडलेल्या "Annexure B" मध्ये Microsoft Excel sheet मध्ये भरुन समर्पक कारणे व विद्यार्थ्यांचे दोन्ही अभ्यासक्रमाचे Choice Code No. भरुन आपल्या शिफारशी **दिनांक १५ जुलै २०१७ पूर्वी** या संचालनालयास सादर करण्यांत याव्यात. तसेच desk2@dtemaharashtra.gov.in या ई-मेल वर सदर माहितीची Soft copy सुध्दा उपलब्ध करून द्यावी. येथे असेही सुचित करण्यात येते की, आपल्या संस्थेत/विद्यापीठामध्ये परीक्षेचे निकाल गुणांऐवजी ग्रेड पॉईंटमध्ये देण्याची पध्दत असल्यास सदर ग्रेड पॉईंटचे संपूर्ण गुणांमध्ये अथवा टक्क्यांमध्ये रुपांतरित (कनव्हर्ट) करुन गुण/टक्के नमूद करावेत.

३. अ.क्र. २ नुसार विद्यार्थ्यांचे संस्था बदलाचे प्रस्ताव सादर करतांना या पत्रासोबतच्या "Annexure A" च्या नमुण्यात विद्यार्थ्यांचा विनंती अर्ज, गुणपत्रिकांची साक्षांकीत प्रत, विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र किंवा रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा द्वितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास) व संस्था बदलीच्या कारणाच्या पृठ्यर्थ पुरावे, इ. दस्तावेज सादर करावीत

४. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थामध्ये संस्थाबदल अनुज्ञेय नाही अशी स्पष्ट तरतूद संदर्भ क्रमांक ३ व ४ अन्वये निर्धारीत केलेल्या नियमात असल्याची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शणास आणावी व असे अर्ज आपल्या स्तरावरुन निकाली काढण्यात यावेत. तसेच बदली मागितलेल्या विद्यार्थ्यांस या संचालनालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये. तसेच संस्थेतील सर्व बदली इच्छुक विद्यार्थ्यांची गुणवतेच्याक्रमाने यादी तयार करतांना सदरहू विद्यार्थ्याच्या प्रवेशाचा प्रकार सुपरन्युमरी कोटयातील आहे किंवा कसे? याच्या तपशीलासह व आपल्या शिफारशीसह या कार्यालयास सादर करावी व या संदर्भात कोणत्याही विद्यार्थी व पालकांस या प्रकरणी संचालनालयास संपर्क साधण्यास सूचित करू नये.

येथे असेही नमूद करण्यात येते की, समर्पक कारणे व आपल्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय विद्यार्थ्यांच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यांत येणार नाही. तसेच द्वितीय वर्षाची अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागांची माहिती सोबतच्या "Annexure C" मध्ये सादर करावी. विद्यार्थी ज्या संस्थेत व अभ्यासक्रमात शिकत आहे व ज्या संस्थेत बदली मागितलेली आहे. त्या संस्थेच्या नांवासमोर इन्स्टीटयुट कोड, अभ्यासक्रमाचे नांव व कोर्स कोड नमूद करण्यांत यावा.तसेच याबाबतची माहिती आपल्या शिफारशीसह निश्चितपणे दि. १५.०७.२०१७ पर्यंत या संचालनालयास प्राप्त होईल अशा बेताने पाठवावी, तद्नंतर आलेली प्रकरणे व माहितीचा विचार करण्यात येणार नाही अशी प्रकरणे दप्तरी दाखल केली जातील याची नोंद घ्यावी.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, मुंबई ४०० ०५१ यांना माहितीसाठी सादर

२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

H:\Kedare\2016\Transfer 2016\Cercular.Docx

## ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I, II OR III YEAR

1. Name of the Student (In Full) :
2. Application ID :
3. Academic year of Admission in the present Institute :
4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :
5. Address for correspondence with Pin code & Telephone Nos. ( if any) :
6. Name of parent / present Institute with DTE Code : DTE CODE ____________
   Name ________________________________
7. Course of Study Details : Year / Semester ________ Branch _____
   Choice Code _____________
8. Details of the Result of last exam.

| Branch / Faculty | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7 |
| | | | | | | |

9. Details of backlog subject (if any) :
10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought :

| Preference wise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year ---- Engg./tech.) | Choice Code No. | University |
|---|---|---|---|---|
| | | | | |

11. Reasons for asking the transfer of Institute/ change of branch and University : ________________________________
________________________________
________________________________

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date : / /2017** **Signature of Student**

---

Name and DTE code of the parent / present Institute: ________________________________

No --------------------- Date :- / /2017

**No Objection Certificate**

Certified that information furnished by applicant (Name) ------------------------------ is verified form the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute Signature of Principal

## Statement B

### Statement showing the list of candidate applied for change of Institute & Branch for Second / Third / Final year for A.Y. 2017-18

| Sr. No | Name of the Students | Application ID | Name of Current Institute | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Whether Admission is under Supernumer ary quota (Y/N) | Total Marks obtained (Out of CGPA) | % of Marks | Preferencewise Institute Name | Institute Code No. | Year and Course Name (e.g. 2nd / 3rd year — Engg./tech.) | Choice Code No. | Reasons for Transfer | Remarks (Institute) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

Seal of College / Institute

Signature of Principal

Name of the Institute :

DTE Code :-

## Statment C

### Statements Showing Vacancy Position for A.Y. 2017-18

| Sr. No. | Name of Branch | Year | Sanctioned Intake 2016-17 or respective year of 1st year Admisson | Students admitted A.Y. 2017-18 (as per Col. 4) | Vacancy [ Col. 4-5 ] | Student in pipeline (Backlog passed students) | Sudents admitted due to Change of branch at Institute level | Sudents shifted due to Change of branch at Institute level | Net Vacancy available [Col. (6+9)- (7+8-)] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 9 |
| | | Second | | | | | | | |
| | | Third | | | | | --- | --- | |
| | | Final | | | | | --- | --- | |
| | | | | | | | | | |

Seal of College / Institute

Signature of Principal